Impact Factor-7.675 (SJIF)
ISSUE No- (CCCXVIII) 318 (A)

ISSN-2278-9308
September-2021

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Editor
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318 (A)

Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar



Chief Editor

Prof. Virag S. Gawande

Director

Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

Editor

Dr. Pramod S. Meshram

I/c Principal,

Shri M. H. K. College of Arts & Comm. Pachal

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati

Website – www.aadharsocial.com **Email** – aadharsocial@gmail.com.

INDEX-A

No.	Title of the Paper Authors' Name	Page No.
1	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्यस्थिती प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड	1
2	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सिध्दांतवादी सामाजिक चळवळ डॉ. प्रमोद एस. मेश्राम	7
3	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य डॉ.विकास शंकर पाटील	12
4	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रवाद संकल्पना प्रा.श्री. अमोल अरूण कुंभार	16
5	बाबासाहेब आणि वर्तमान काळात धर्मांतराची आवश्यकता डॉ. अनंता सूर	21
6	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व कार्य अनिल मधुकर केदारे /प्रा.डॉ. सोंडगे तात्याराम परमेश्वर	28
7	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील स्त्रीयांचे योगदान प्रा. डॉ. अनिल आय. थूल	33
8	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन– एक नवा दृष्टीक्षेप डॉ.अनिता शिंदे	38
9	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार आणि सामाजिक न्याय प्रा.डॉ.गव्हाळे बी.व्ही.	42
10	स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव आणि परिणाम डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे	47
11	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार भिमराव परमेश्वर वाघमारे	53
12	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादविषयक विचार प्रा. डॉ. चांगुणा विठठल कदम	56
13	डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक असामान्य अर्थतज्ज्ञ चार्वाक आनंदराव खैरे	61
14	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविशयक विचार व कार्य प्रा.चिन्नना एम. चालूरकर	66
15	डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार प्रा.डॉ.डी डी.जोंधळे	70
16	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांविषयक विचार व कार्य प्रा. दिलीप यशवंत बर्वे	76
17	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन प्रा.डॉ.जाधव दिलीप रामचंद्रराव	82
18	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मविषयक विचार प्रा. ज्ञानेश्वर भोसले	85

19	बाबासाहेबांचे धर्मांतर डॉ. गजानन लोंढे	90
20	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार व कार्ये. गोकुळ भटू अहिरे	96
21	अर्थ शास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयश्री भदर्गे	101
22	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार डॉ. ज्योती परब	105
23	राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. कैलास महाले	112
24	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दलित कवितेवरील प्रभाव डॉ. कैलास बुधा वाघ	115
25	डॉ. बबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार प्रा.डॉ कार्तिक पोळ	122
26	ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे	126
27	२१व्या शतकातील महानायक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा.डॉ. लखपती वा. गायकवाड	135
28	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मनिरपेक्षतेसंबधी विचार प्रा. लक्ष्मण नागोराव कुमारे/प्रा. डॉ. सुनील दिनकर पवार	139
29	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य मधुरा मकरंद पाटिल	142
30	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टीकोन प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव	148
31	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिक्षेत्रातील योगदान आणि कृषिविशयक विचारांचे अध्ययन प्रा. डॉ. एन. एन. गाढे	151
32	पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नवाजी गेंदलाल घरत	155
33	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'मूकनायका'तील अग्रलेख प्रा. नील नागभिडे	159
34	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेले सत्याग्रह प्रा.डॉ.पंजाब लक्ष्मण शेरे	164
35	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता एक विचारमंथन प्रा.डॉ. मोकळ प्रभाकर रामजी	167
36	डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बौध्दधर्म विषयक विचार कार्य प्रा.डॉ.प्रदीप पांडुरंग तलवारे	170
37	पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. प्राजक्ता रामदास शित्रे	175
38	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार प्रा प्रमोद केशवराव मुळे	185
39	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले	188
40	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार सहा. प्रा. परमानंद उके	193

41	उदारवादी प्रजातंत्र के संदर्भ में बाबासाहाब डॉ. अम्बेडकर के विचार डॉ. किशोर बी. वासनिक	197
42	डॉ. आंबेडकरजी के महिला विषयक विचार श्रीमती. डॉ. करूणा दत्तात्रय अहिरे	201
43	हिंदी उपन्यास-साहित्य में प्रतिबिंबित डॉ. आंबेडकरजी की विचारधारा प्रा. डॉ. अशोक आनंदराव साळुंखे	204
44	डॉ. बाबासाहेब आंबेडकर का नारीसंबधी दृष्टीकोन और कार्य प्रा. अशोक गोविंदराव उघडे	209
45	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्रोही पत्रकारिता डॉ. संभाजी पाटील /प्रा. बापूसाहेब जवळेकर	212
46	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता रोहिणी साळुंखे-चव्हाण	221
47	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणिबौध्द धर्म डॉ. रोहिणी रामचंद्र हाके	225
48	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समाजरचनेची सैध्दांन्तिक मांडणी डॉ. रेखा कचरूजी मेश्राम	228
49	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महिला विषय भूमिका व कार्य : एक चिकित्सा डॉ. रेखा मनोहर बडोदेकर	233
50	अस्पृश्यतामुक्ती चळवळ आणि आंबेडकरी चळवळ प्रा.रमेश शंकर माने	237
51	आंबेडकरवादी कविता डॉ. राखी मंगेश जाधव	245
52	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्य:स्थिती प्रा. प्रदीप सहदेव चोपडे	249
53	डॉ बाबासाहेब आंबेडकरांची अग्रलेखाची भाषाशैली डॉ पांडुरंग गावडे	253
54	डॉ. आंबेडकर: व्यक्तित्व आणि कार्य प्रा. मुरलीधर बापूराव गवळी	256
55	भारतीय महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे	260
56	ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी	263
57	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार डॉ. गुरूनाथ इश्राम सामंत /डॉ. जयंत शिवाजी कार्तिक	266
58	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यविषयक विचार आणि कार्य डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे	273

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII) A
ISSN : 2278-9308
September, 2021

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादविषयक विचार "

प्रा. डॉ. चांगुणा विठठल कदम
इतिहास विभाग,बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव ता. आंबेगाव, जि. पुणे.
मोबाईल नं. ९५२७७९७६८६,ईमेल–kadamcv.78@gmail.com

प्रास्ताविक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतिप्रवाहाचे कृतिशील विचारवंत व नेते होते. विसाव्या शतकातील महान विचारवंत, प्रख्यात घटनातज्ञ, थोर समाजसेवक, दूरदर्शी राजकारणी म्हणून ते ओळखले जातात. आधुनिक भारताची जडणघडण ज्या श्रेष्ठ महापुरूषांच्या कर्तृत्वाने झाली, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होतो. दलितांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी, त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी ते आयुष्यभर झटले. पण हे कार्य करित असताना भारताचे ऐक्य, या देशातील लोकशाही, यांना धोका पोहचणार नाही याची त्यांनी सतत काळजी घेतली. ते दलितांचे कैवारी तसेच प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांच्या कार्यामध्ये दलितांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारा नेता आणि राष्ट्रवादी नेता या भूमिकांचा समन्वय आढळतो.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादविषयक विचार' या शीर्षकाखाली प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून राष्ट्रवादाचा ऐतिहासिक विकासक्रम, राष्ट्रवादाचे सैध्दांतिक अधिष्ठान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादविषयक विचारांचे चिकित्सक विवेचन केलेले आहे.

राष्ट्रवादाचा ऐतिहासिक विकासक्रम–

१७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती ही जगातील महान परिवर्तनवादी घटना मानली जाते. या क्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, व बंधुता ही तत्वे बहाल केली. त्याचबरोबर जगामध्ये आधुनिक राष्ट्रवादाची सुरूवात झाली. या फ्रेंच राज्यक्रांतीपुढे अमेरिकन क्रांतीचा आदर्श होता. त्यामुळे राष्ट्रवादाला चालना देणारी पहिली घटना म्हणून अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचा उल्लेख करावा लागेल. मात्र युरोपात राष्ट्रवाद आणण्याचे कार्य फ्रेंच राज्यक्रांतीने केले. या क्रांतीने सर्वसामान्य जनतेला राजसत्ता, सरंजामदार, व धर्मगुरू यांच्याविरूध्द एकत्र आणले.

राष्ट्रवादाचे सैध्दांतिक अधिष्ठान–

एक विचारप्रणाली म्हणून राष्ट्रवाद ही एक अलीकडची बाब आहे. राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना सर्वश्रेष्ठ आदर्श समजून त्यांना आपल्या निष्ठा समर्पित करायला लावणारी आणि त्यांच्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी करून घेणारी राष्ट्रवाद ही एक आधुनिक विचारप्रणाली आहे. फारपूर्वी राष्ट्रवाद ही विचारप्रणाली अस्तित्वात नव्हती. कारण राज्यांच्या सरहददी राष्ट्रीयतेच्या तत्वावर आधारित नव्हत्या. नगरराज्यांना किंवा सामंतांना, धर्मसंस्थेला, एखाद्या घराण्याला लोक आपल्या निष्ठा अर्पण करीत असत. मध्ययुगाचा कालखंड संपुष्टात आल्यानंतर जगभर राष्ट्र– राज्यांचा उदय झाला. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक सरंजामी सत्ता एकत्र आल्या. एकोणिसाव्या शतकापासून तर राष्ट्रवाद ही युरोपच्या इतिहासाची प्रमुख प्रेरणा होती. पहिल्या महायुध्दानंतर आफ्रिकी देशांचे इतिहास घडवण्यातही राष्ट्रवादाच्या विचारप्रणालीचे मोठेच योगदान होते. राष्ट्रवाद या संकल्पनेमध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे, देशातील जनतेच्या मनात ऐक्याची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. भावनात्मक ऐक्य ज्यावेळी लोकांमध्ये निर्माण होते त्यावेळी जात, धर्म, वंश, भाषा इत्यादी गोष्टींना गौण स्थान असते. थोडक्यात, राष्ट्रवाद म्हणजे आपल्या राष्ट्राबद्दल व्यक्तीला वाटणारे प्रेम किंवा व्यक्तीची

राष्ट्राच्याठायी असलेली निष्ठा होय. या संदर्भात प्रो. हॅन्स कोन म्हणतात, "राष्ट्रवाद मुख्यत्वेकरुन एक मनस्थिती आहे. ती एक जागृती आहे. विसाव्या शतकात राष्ट्रवाद हा सर्व जगातील राजकीय जीवनाचा एक सामान्य प्रकार झाला आहे."१

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रवाद विषयक विचार–

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद या विषयावरील विचार इतके अनाक्षेपार्ह आहेत की, त्यांच्याबद्दल त्यांच्या समकालीन भारतीय विचारवंतांचे त्यांच्याशी मतभेद संभवूच शकत नव्हते. याशिवाय डॉ. आंबेडकरांनी केवळ भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी सहकार्य केले नाही, याकरिता त्यांच्यावर परधार्जिणेपणाचा दोषारोप चिकटविणे अन्यायकारक होईल. कारण राष्ट्र आणि राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, राजकीय व सामाजिक लोकशाही, राज्यसमाजवाद आणि व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादी विषयांवरील डॉ. आंबेडकरांचे विचार आपल्या बव्हंशी समकालीन विचारवंतांपेक्षा अगदी वेगळे आणि मुलभूत होते. कारण त्या प्रश्नांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोनच संपूर्णपणे वेगळा होता. केवळ राजकीय दृष्टीने कोणत्याच प्रश्नांचा विचार त्यांनी केला नाही तर प्रत्येक प्रश्नाचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भ त्यांना अधिक महत्वाचे वाटले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा जर आपण विचार केला तर, लो. टिळक, म. गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, यांच्या राजकीय कार्यातून व संघटनांतून भारताला स्वातंत्र्य मिळाले. असे जर आपण मान्य केले तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका राष्ट्रवादाचीच होती. राष्ट्रवादातून स्वातंत्र्यासाठी त्यांनी एक मोठी चळवळ सुरु केली, असं त्यांच्या प्रत्येक आंदोलनातून दिसून येते, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा देशभक्तीच्या प्रेरणेतून निर्माण झालेला, उदयास आलेला होता. या परिप्रेक्ष्यातून विचार केला असता, असे जाणवते की, डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादी कर्तृत्वाचे आकलन पुरेशा वस्तुनिष्ठतेने व विवेकशील अभ्यासातून करणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदुत्ववादी भूमिका मान्य नव्हती, कारण सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाकडे पाहण्याचा तो दृष्टिकोन स्वयंकेंद्रिय होता. त्यामुळे तळातील जातीजमातींना खरेखुरे प्रतिनिधित्व मिळणे शक्य नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रवादाची मीमांसा एका वेगळया प्रकारे केली. त्यांनी राष्ट्रवादाची एक पर्यायी दृष्टी मांडली ज्यामध्ये त्यांनी दलितांच्या राष्ट्रीय आशाआकांक्षा व जाणिवांचा अंतर्भाव केला. त्यांच्या राष्ट्रवादाचा अंतिम उद्देश जन्म, व्यवसाय व भाषा यांवर आधारित कोणताही भेदभाव नसलेला समाज स्थापन करणे हा होता. थोडक्यात, त्यांना जात व वर्गविरहित समाज निर्माण करावयाचा होता.

१९४० सालापर्यंत डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रवादावर फार कमी प्रमाणात लिखाण केले होते. मात्र 'पाकिस्तान ऑर पार्टिशन ऑफ इंडिया' या ग्रंथात त्यांनी आपल्या 'राष्ट्र' या संकल्पनेची व्याख्या करण्याची मोठी कामगिरी केली. त्यांनी राष्ट्र या संकल्पनेची चौकट पक्की केली, आणि इतिहासाच्या अन्वयार्थाच्या संदर्भात त्याची उकल करण्याची तसही घेतली. डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या 'राष्ट्रा'च्या संकल्पनेवर १९ व्या शतकातील फ्रेंच विचारवंत अर्नेस्ट रेनन यांचा खूप प्रभाव होता. त्यांनी रेननच्या विचारांवर आपली राष्ट्राची व्याख्या केलेली असली तरी त्यांनी रेननच्या विचारांमध्ये फेरबदल केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रवादाची व्याख्या 'राष्ट्र म्हणून एकत्रित राहण्याची इच्छा' अशी केल्यामुळे त्यांना हिंदू आणि मुस्लिम लोकांमध्ये अशी इच्छा असण्याची शक्यता पडताळून पाहणे आवश्यक वाटले. त्यांनी हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील संबंधाचा इतिहास बारकाईने अभ्यासला. त्यातून ते या निष्कर्षावर पोहचले की, "हिंदू व मुस्लिम हे एकच राष्ट्र आहेत, हा विचार टिकू शकत नाही, त्यांच्यामते, भारतातील मुस्लिम लोकांची एकत्रित राहण्याची जेवढी इच्छा होती तशा प्रकारची कोणतीही इच्छा हिंदू व मुस्लिम लोकांमध्ये नव्हती."२ डॉ. आंबेडकरांनी

राष्ट्रवादाच्या संकल्पनेला फक्त भारताच्या संदर्भात पाहिले नाही, त्यांना याची कल्पना होती की, जर भारतीय राष्ट्राचे आकलन व्हायचे असेल, तर इतर देशांमधील राष्ट्रवादाचा परिणाम देखील अभ्यासला पाहिजे. आणि म्हणूनच त्यांनी झेकोस्लोव्हाकिया, तुर्की, पोलंड, जर्मनी, कॅनडा आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या देशातील राष्ट्रवादासंबंधीची उदाहरणे सांगून भारतीय परिस्थितीच्या संदर्भातील आपल्या युक्तिवादांचे समर्थन केले. डॉ. आंबेडकरांच्या मते, तुर्कस्थान आणि झेकोस्लोव्हाकिया या दोन देशांच्या ऱ्हासाचा सखोल अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, एकदा राष्ट्रवाद उफाळून आला म्हणजे त्याला स्थानिक स्वायत्तता किंवा धर्माचे बंधन आवर घालू शकत नाही. हा धडा हिंदूंनी या दोन राष्ट्रांपासून घेणे आवश्यक होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू लोकांनी स्वत:लाच हा प्रश्न विचारावा की, जर अरब राष्ट्रवाद तुर्की सामाज्य उलथवून टाकू शकतो, स्लोव्हाक राष्ट्रवाद झेकोस्लोव्हाकियाला धुळीस मिळवू शकतो, तर भारत देशाचा ऱ्हास मुस्लिम राष्ट्रवादापासून कसा रोखता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्मासोबत राष्ट्रवाद जोडण्याचा प्रयत्न केला आहे. बौध्द धर्ममध्ये श्रॅम जीम च्मवचसमश्या गोष्टीला अनन्यसाधारण महत्व आहे. तसेच राष्ट्रवादाच्या संदर्भात आपण विचार केला तर श्रॅम जीम च्मवचसमश्ही संकल्पना जोपर्यंत अस्तित्वात येऊ शकत नाही, तोपर्यंत राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते, आधी राष्ट्रवाद जन्म घेतो, नंतर राष्ट्रवादाच्या लढयातून राष्ट्र निर्माण होते. राष्ट्र मिर्मितीची प्रक्रिया आधी निर्माण होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रवादाची मांडणी करताना स्पष्टपणे असे म्हणतात की, "ब्रिटिशांच्या आधी भारत नावाचा देश अस्तित्वात नव्हता. ब्रिटिशांनी भारतात सत्ता प्रस्थापित केल्यानंतर समग्र भूभागावर आपलं प्रशासन निर्माण केले, भारतातील पूर्ण समाज जाती—जातींमध्ये विभगलेला आहे असा बहुसंख्य समाज केवळ एका कायद्याच्या वरवंटयाखाली ब्रिटिशांच्या राज्यामुळे आला. एक समान शत्रू ब्रिटिश असल्यामुळे या ब्रिटिशांना कसे मायदेशी पाठविता येईल, या विचारातून एक प्रकारची राष्ट्रीय भूमिका भारतीयांमध्ये निर्माण झाली तिथून राष्ट्रवादाची खरी सुरूवात भारतीयांमध्ये झाली. "३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांच्या निर्मितीतील सर्वात मोठी समस्या म्हणजे जातीव्यवस्था होय. यावर डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, "जातीव्यवस्थेमुळे हिंदू हे राष्ट्र तर सोडाच, पण 'समाज' या संज्ञेला पात्र नव्हते. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर सुध्दा भारताचे वर्णन 'राष्ट्र' असे न करता 'भारताचे लोक' असे करावे असा डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता."४. त्यामागे त्यांचा उदात्त हेतू होता. त्यांच्या मते, आपण अजून खऱ्या अर्थाने राष्ट्र बनलेले नाही. हे एकदा लोकांना लक्षात आल्यानंतर राष्ट्र बनण्यासाठी प्रयत्न करता येतील. त्यांनी जरी पाकिस्तान मागणीचे समर्थन केले असले तरी त्यामागे राष्ट्रहित पाहण्याची त्यांची वास्तव दृष्टीच आढळते.

'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथाशिवाय 'स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटिज', 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', 'रानडे, गांधी ॲंड जीना' तसेच प्रसंगोपात्त केलेल्या भाषणांतून त्यांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार व्यक्त झाले आहेत. त्यादृष्टीने फुटीरतावाद, प्रांतवाद, भाषावाद, जातीयता व जमातवाद याविरूध्द त्यांनी युध्द पुकारले होते. जातीयतेने हा देश सामाजिक व राजकीयदृष्टया दुर्बल झाला आहे असे त्यांचे निदान होते. ते म्हणतात, "सार्वजनिक वृत्तीला जातीयतेने ठार मारले आहे, सार्वजनिक सहृदयता तिने नष्ट केली आहे, लोकमत तिने अशक्य करून सोडले आहे, सद्गुण आज जातीला चिकटला असून नीतीमत्ताही जातीभावनेने जखडून टाकली आहे. सत्पात्रांबद्दल सहानुभूती नाही, गुणवंतांचे कौतुक नाही, गरजवंतांसाठी औदार्य नाही, औदार्य आहे, पण त्याचा

प्रारंभ आणि शेवटही जातीतच होतो. सहानुभूती आहे, पण ती अन्यजातीयांसाठी नाही, अशी ही जातीयता राष्ट्रवादाच्या विकासाआड येते."५

ज्यावेळेस भाषिक प्रांतरचना हा विषय संसदेत मांडला गेला त्यावेळी बाबासाहेबांनी भाषिक प्रांताला विरोध केला होता. त्यामागील त्यांची भूमिका अशी होती की, एका भाषेचे जर अनेक राज्य राहू शकतात, तर एका भाषेचे राज्य करण्यासाठी तुम्ही आग्रह का धरता? अशा प्रकारचे राज्य जर आपण निर्माण केले तर, राज्यांसाठी, देशासाठी हे धोकादायक आहे. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी भाषिक राज्याच्या निर्मितीला विरोध केलेला दिसून येतो. भारत हे एक बहुभाषिक राष्ट्र आहे त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होण्यास एक अडचण निर्माण होते याची जाणीव आंबेडकरांना होती. तरीपण भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावरत्यांची अढळ श्रध्दा होती. भाषिक विविधता राष्ट्रवादाचा विकास अडवून ठेवू शकत नाही हे गृहित धरूनही आंबेडकरांना असे मात्र वाटले की, एक समान भाषा असणे राष्ट्रनिर्मितीस उपकारक ठरत असते. भाषा ही संस्कृतीचे वाहन असते. समान भाषेतून समान संस्कृती साकार झाल्यास या देशातील सांस्कृतिक व वांशिक संघर्षही विलय पावू शकतील, असात्यांना विश्वास होता. राष्ट्राचे ऐक्य व राष्ट्रवाद या उभयतांचा समान भाषा हा मुख्य आधार ठरू शकतो असे त्यांना वाटत होते.

राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांचा संबंध देशभक्तीच्या आणि एकतेच्या भावनेशी असतो हे जरी डॉ. आंबेडकरांनी मान्य केले असले तरी, राष्ट्रवादाने आपापसातले भेदभाव नष्ट करावेत, म्हणजे तो अधिक शक्तिशाली होईल असे डॉ. आंबेडकर मानीत. याचा अर्थ आंबेडकरी राष्ट्रवादाचा उगम दलित, शोषित या वर्गाच्या कळवळयात होतो. जोपर्यंत हा वर्ग दास्य दारिद्रयातून मुक्त होणार नाही तोपर्यंत खरा राष्ट्रवाद निर्माण होणार नाही अशी त्यांची भूमिका होती. यासंदर्भात डॉ. श्रीपाल सबनीस अशी मांडणी करतात की, □सामाजिक विषमता नष्ट करून समानतेची संधी व हक्क सर्व दलितांना प्राप्त करून देण्याचा आंबेडकरी ध्येयवाद हा गांधी व सावरकरांच्या भूमिकेच्या तुलनेत सैध्दान्तिक व व्यवहारिक सिध्दीच्या दृष्टीने श्रेष्ठ होता."६. माणुसकीचा हक्क म्हणून दलितांना समानतेची संधी तत्कालिन हिंदू समाजव्यवस्थेने मान्य केली नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना मंदिर प्रवेशाची चळवळ, महाडचा सत्याग्रह तसेच मनुस्मृतीचे दहन करावे लागले. या सर्व घटना दलितांच्या मुक्तीसाठीच होत्या. यावरून डॉ. आंबेडकरप्रणित राष्ट्र आणि राष्ट्रवाद ही संकल्पना दलितांच्या मुक्तीशिवाय पूर्ण होवूच शकत नाही. दलितमुक्ती आणि राष्ट्रमुक्ती या दोन्ही संकल्पना एकत्र करूनच डॉ. आंबेडकरांची राष्ट्रभक्ती समजून घ्यावी लागते. समान संधी आणि मानवी हक्क अनेक शतकांपासून ज्या समाजाला नाकारण्यात आले त्या समाजावरील अन्याय दूर झाल्याशिवाय राष्ट्रबांधणी शक्य नाही. असा डॉ. आंबेडकरांचा विचार होता.

केवळ स्वातंत्र्य प्राप्ती झाल्याने दलितांची स्थिती सुधारणार नाही. राजकीय स्वातंत्र्याची मागणी पुढे रेटणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीस सहकार्य करणे डॉ. आंबेडकरांना शक्य नाव्हते तरी देखील त्यांनी ब्रिटिश राजवटीवर सडेतोड टीका केली. त्यांच्या विवेचनानुसार □न्याय्य तत्वांच्या आधारे सामाजिक व आर्थिक फेररचना झाल्याखेरीज खरा एकजिनसी समाज निर्माण होणर नाही. एकजिनसी समाज जर नसेल तर राष्ट्रवाद निर्माण होणे कठीण आहे. एकतेची भावना हा राष्ट्रवादाचा निकष असल्याने त्यांचे विचार तर्कसंगत वाटतात."७. देशातील तळागाळातील वर्गाला स्वातंत्र्याचे लाभ मिळाल्याखेरीज खरे स्वातंत्र्य असूच शकत नाही अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. गोलमेज परिषदांमध्ये हजर राहून त्यांनी वंचित वर्गाच्या हक्क व अधिकारांची प्रकर्षाने मांडणी केली.

निष्कर्ष–

राष्ट्रवादाचे आक्रमक व जुलमी स्वरूप डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. दहशतवादाचा पुरस्कार करणारा, देशभक्तीच्या आत्यंतिकतेपोटी अन्य देशीयांचा द्वेष करणारा, संकुचित राष्ट्रवाद डॉ. आबेडकरांनी कधीच समर्थनीय मानला नाही. अतिरेकी राष्ट्रवादास ते प्रतिकूल होते कारण असा राष्ट्रवाद सहजासहजी अविवेकी होऊन असहिष्णूतेस जन्म देतो. पूर्वग्रहपूषित, अमानुष आणि असहिष्णू असा राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. राष्ट्रवादाने धर्म वा प्रादेशिक देशभक्तीच्या सरहद्दीवर थांबू नये असे त्यांचे मत होते.राष्ट्रवादाचे उग्र स्वरूप त्यांना मान्य नव्हते. त्यांचा राष्ट्रवाद म. गांधी आणि पंडित नेहरूंच्या राष्टवादाप्रमाणे आंतरराष्ट्रीय वादाकडे जाणारा होता.

थोडक्यात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरस्कारिलेला राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष, बुध्दिप्रामाण्यवादी व परोपकारी होता. तसाच तो शांततावादी व अनाक्रमकही होता. राष्ट्रवादाच्या नावाने प्राचीन भारतीय परंपरेचे आंधळे पुनरूज्जीवन करणे, व्यक्ती पूजेचे देव्हारे माजविणे त्यांना मान्य नव्हते. भारताचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्षच असावा असा त्यांचा आग्रह होता.

संदर्भ व टीपा –

१. एन. एस. तांबोळी, व इतर (संपा.), आधुनिक जग , निराली प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, जुलै २००४. पृ. ०३.

२.अशोक चौसाळकर, (संपा.), सम्राजप्रबोधनपत्रिका, वर्ष – ५४, अंक २१६, ऑक्टोबर – डिसेंबर २०१६, सम्राजप्रबोधनसंस्था, पुणे, पृ. १४३.

३.नरेंद्र जाधव, (संपा.), बोल महामानवाचे, ग्रंथाली प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१२, पृ. २९९.

४.वा. भा. पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, २००९. पृ. २१६.

५.भा. ल. भोळे, आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २००३, पृ. ८२९.

६.श्रीपाल सबनीस, ज्ञानेश्वर ते आंबेडकर, दिलीपराज प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१३. पृ. १२९.

७.वा. भा. पाटील, पूर्वोक्त, पृ २१७.

८.चांगदेव भवानराव खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड – ८, सुगावा प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९९.

९.चांगदेव भवानराव खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड – १०, सुगावा प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २०००.